मा. मंत्री (महसूल) यांचे कार्यालय, शिबिर कार्यालय, नागपूर, दिनांक 14 डिसेंबर 2015.

**प्रसिध्दीपत्रक**

## आत्महत्येकडून आत्म निर्भरतेकडे जाण्यासाठी शेतक-यांकरिता दुग्ध व्यवसाय उत्तम मार्ग - मंत्री एकनाथराव खडसे यांचे प्रतिपादन

नागपुर, दिनांक 14 डिसेंबर : नापिकी, नैसर्गिक आपत्ती, इत्यादीमुळे संकटात सापडलेल्या शेतक-यांना आत्महत्तेकडून आत्म निर्भरतेकडे जाण्यासाठी शेतीला जोड धंदा म्हणून दुग्ध व्यवसाय आणि त्याचे व्यवस्थापन हा एक उत्तम उपाय आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषि, महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी आज येथे केले.

नागपुर येथे भरलेल्या ॲग्रो व्हिजन या कृषि प्रदर्शनानिमित्त आयोजित दुगध शाळा व्यवस्थापन या विषयावरील चर्चासत्राच्या उद्‌घाटन प्रसंगी खडसे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शेतक-यांना दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी गाईंच्या संख्येत वाढ व्हावी, याकरिता गोहत्या बंदी कायदा आणि गोवंश रक्षणासाठी राज्य शासनाने उपाय योजले आहेत. या उपायांचा एक भाग म्हणून राज्य शासनाने आता पर्यन्त 8,000 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च केली आहे. यापुढील काळात राज्यातील, विशेषतः विदर्भातील बंद पडलेल्या दुग्धशाळा व दूध प्रक्रिया संस्था, पुनरुज्जिवीत करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. त्यामुळे शेतक-यांचाच लाभ होणार आहे. आजच्या चर्चासत्रात या क्षेत्रातील तज्ज्ञांनी केलेल्या सूचना व शिफारशींचे आम्ही स्वागतच करु, असे खडसे यांनी शेवटी सांगितले.

सुरुवातीस चर्चासत्राचे निमंत्रक गिरीश गांधी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात आजच्या चर्चा सत्रात दुग्ध व्यवसायाची सुरुवात कशी करावी, दुभत्या जनावरांसाठी समतोल व पोषक खाद्याचे नियोजन, महाराष्ट्रात दुगध व्यवसायाच्या विकासाकरिता धोरणात्मक उपाय, दुगध प्रक्रीया इत्यादी विषयावर या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन करणार आहेत.

*****